सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २३४ | रविवार, दि. १७ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com




# आ.अनिलदादा पाटील यांची ग्रामीण रुग्णालयास भेट



अमळनेर : ग्रामीण रुग्णालयात सुरु असलेल्या बांधकामासंदर्भात सूचना करताना आमदार अनिलदादा पाटील आणि कार्यकर्ते.

## उष्माघात कक्षाची केली पाहणी, उपजिल्हा रुग्णालयाचे काम दोन महिन्यात पूर्ण करण्याचे आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः-येथील ग्रामीण रुग्णालयात माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी आज अचानक भेट देऊन पाहणी केली. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम सुरू असल्याने बंद असलेले स्वच्छतागृह , तुटलेले दरवाजे, नवीन बांधकामाची संथगती पाहून त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

उपजिल्हा रुग्णालयासाठी वरील मजल्यावर सुरू असलेल्या बांधकामाची गती अत्यंत संथ असल्याचे निदर्शनास आल्याने याबाबत आमदार पाटील यांनी बांधकाम विभागाच्या अभियंत्यांना धारेवर धरले. सदर बांधकाम कोणत्याही परिस्थितीत पुढील दोन महिन्यात पूर्ण करण्याचे कडक आदेश त्यांनी दिले.बांधकाम सुरू असल्याने वर्षभरापासून बंद असलेले स्वच्छतागृह सुरू करण्यासह दुरुस्ती व दरवाजांची तुटफुट तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचनाही दिल्या. रुग्णालयातील बेडशीट अस्वच्छ असल्याने याबाबतही आमदारांनी नाराजी व्यक्त केली. रुग्णांच्या आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.औषधालयासह प्रत्येक विभागात प्रत्यक्ष

पान २ वर

## शिक्षण, सामाजिक व अध्यात्मिक सेवेतून घडलेले प्रेरणादायी नेतृत्व : भरतदादा अमळकर



जळगावच्या सामाजिक, शैक्षणिक, उद्योजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात गेली अनेक दशके सातत्याने कार्यरत असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे भरतदादा अमळकर. शिक्षण संस्था उभारणी, सामाजिक प्रकल्पांचे व्यवस्थापन, युवकांमध्ये नेतृत्व निर्माण करणे, तंत्रशिक्षण क्षेत्रातील योगदान आणि समाजाभिमुख दृष्टिकोन या माध्यमातून त्यांनी खानदेशात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. साधेपणा, स्पष्टवक्तेपणा, दूरदृष्टी आणि संघटन कौशल्य यामुळे ते विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत.

डॉ.भरतदादा अमळकर यांचे व्यक्तिमत्त्व केवळ उद्योजक किंवा संस्थाचालक म्हणून मर्यादित नाही; तर समाजजीवनातील विविध घटकांना जोडणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. विद्यार्थी जीवनापासूनच त्यांच्यावर राष्ट्रवादी आणि सामाजिक विचारांचा प्रभाव होता. सामाजिक चळवळींमधील सहभागातून त्यांनी कार्यकर्तेपणाची वाट निवडली आणि पुढे शिक्षण व समाजसेवेच्या माध्यमातून व्यापक जनसंपर्क निर्माण केला.

केशवस्मृती सेवासंस्था समूह आणि विवेकानंद प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून

पान २ वर









## संपादकीय

### सोन्यावरील वाढीव शुल्क

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात इंधन आणि सोन्याचा वापर कमी करण्याच्या केलेल्या आवाहनानंतर, सरकारने अनेक पावले उचलली आहेत. सरकार विविध स्तरांवर इंधनाचा वापर कमी करण्यासाठी काम करत असतानाच, केंद्रीय अर्थ मंत्रालयाने बुधवारी सोने आणि चांदीवरील प्रभावी आयात शुल्क ६% वरून १५% पर्यंत वाढवले. कच्च्या तेलानंतर आयातीच्या टोपलीत सोन्याचा दुसरा सर्वात मोठा वाटा असल्याने, या वाढीव शुल्कामुळे लोक सोने खरेदी करण्यापासून परावृत्त होतील आणि परकीय चलन संतुलन सुधारण्यास मदत होईल, अशी आशा आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये सोन्याची आयात ७२ अब्ज डॉलर इतकी होती आणि आर्थिक वर्ष २०२३ पासून आयातीचे बिल दुप्पट झाले आहे. त्यामुळे, सोन्याच्या आयातीमुळे परकीय चलन खात्यावर भार पडतो आणि कठीण काळात त्याचा परिणाम होतो, यात शंका नाही. तथापि, या शुल्कवाढीचा अपेक्षित परिणाम होईलच असे नाही.भारत जगातील सर्वात मोठ्या सोन्याच्या उपभोयांपैकी एक आहे आणि त्यातील बहुतेक सोने आयात केले जाते. आपले सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि धार्मिक घटक या मागणीला चालना देतात. या शुल्कवाढीमुळे कोणताही महत्त्वपूर्ण बदल होण्याची शक्यता नाही. देशात चांदीचाही महत्त्वपूर्ण औद्योगिक वापर होतो आणि वाढीव शुल्कामुळे तयार मालाच्या किमती वाढतील. पूर्णपणे आर्थिक कारणांमुळे, सोन्याकडे मूल्याचे भांडार आणि महागाईविरुद्धचा एक सुरक्षित उपाय म्हणून पाहिले जाते. तरलतेच्या अभावाचा सामना करणारी गरीब कुटुंबेसुद्धा, कठीण काळात वापरता यावी यासाठी काही बचत सोन्याच्या रूपात ठेवण्यास प्राधान्य देतात.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की, गुंतवणुकीच्या उद्देशाने सोन्याची मागणी कालांतराने लक्षणीयरीत्या वाढली आहे. उदाहरणार्थ, वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या मते, एक्सचेंज-ट्रेडेड फंडांची मागणी २०२५ च्या पहिल्या तिमाहीत अंदाजे ७ टनांवरून २०२६ च्या पहिल्या तिमाहीत अंदाजे २० टनांपर्यंत वाढली. परिस्थिती सुधारल्यावर शुल्कवाढ मागे घेतली जाण्याची शक्यता असल्याने, या मागणीत काही प्रमाणात घट होऊ शकते, ज्यामुळे सोन्यातील साठ्याचे मूल्य कमी होईल. मागणीचे इतर घटक कसे वागतात हे पाहणे बाकी आहे. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये आंतरराष्ट्रीय सोन्याच्या किमती अंदाजे ५० टयांनी वाढल्या. मागील वर्षाच्या तुलनेत प्रत्यक्ष मागणी अंदाजे ५ टयांनी घटली असली तरी, सोन्यावरील खर्च २४ टयांहून अधिक वाढला. त्यामुळे, शुल्कवाढीपेक्षा आंतरराष्ट्रीय किमतींमधील चढ-उतार भारतासाठी अधिक महत्त्वाचे ठरतील. शिवाय, यात इतरही गुंतागुंत आहेत. हे सर्वज्ञात आहे की जास्त शुल्कामुळे तस्करीला प्रोत्साहन मिळते. महसूल गुप्तचर संचालनालयाच्या मते, जुलै २०२४ मध्ये सरकारने शुल्क कमी केल्यानंतर २०२४-२५ मध्ये सोन्याच्या जप्तीमध्ये लक्षणीय घट झाली. आता ही परिस्थिती उलटण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक्त, भारत-यूएई सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारानुसार, भारत १० वर्षांच्या कालावधीत चांदीवरील आयात शुल्क हळूहळू शून्यावर आणेल अशी अपेक्षा आहे. सोन्याची आयात प्राधान्य दरापेक्षा एक टक्का कमी शुल्कावर केली जाऊ शकते. त्यामुळे, एकूण धोरणात्मक चौकटीत, सोन्याच्या आयातीकडे एक संरचनात्मक घटक म्हणून पाहिले पाहिजे आणि कालांतराने शक्य तितक्या लवकर त्यावर उपाययोजना केली पाहिजे. सरकारने सार्वभौम सुवर्ण रोख्यांच्या माध्यमातून या समस्येवर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला, परंतु विविध कारणांमुळे ही योजना अयशस्वी ठरली. यामुळे आर्थिक दबाव कमी होण्यास मदत झाली असती का, हा एक वादग्रस्त मुद्दा आहे. याचा फायदा सरकार आणि व्यवसायांना होतो, परंतु बचतकर्त्यांचे नुकसान होते. बाजाराद्वारे निर्धारित केलेले चांगले व्याजदर आणि वाढलेली आर्थिक समावेशकता गुंतवणुकीची मागणी सोन्यापासून दूर वळवण्यास मदत करू शकतात.

## ग्रामीण रुग्णालयास भेट

पान १ वरून

जाऊन पाहणी करत काही सूचना त्यांनी केल्या. रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला स्वच्छ व दर्जेदार सुविधा मिळाल्याच पाहिजेत, यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करावे, असे त्यांनी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सांगितले.व रुग्णालय प्रशासनाला तातडीने सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले.वैद्यकीय अधिक्षक डॉ.प्रकाश ताळे यांच्या कडून त्यांनी संपूर्ण आढावा घेतला. अमळनेर तालुक्यात उष्णतेमुळे काही बळी जात असल्याने उष्माघात कक्षाची आमदारांनी पाहणी केली.यासाठी कुलर,थंड पाणी व पुरेसा औषधी साठा आणि आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी आमदारांसोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन राजपूत,जितेंद्र ठाकूर,विजय पाटील,जयेश पाटील उपस्थित होते.तर रुग्णालयाच्या वतीने वैद्यकीय अधिक्षक डॉ.प्रकाश ताळे,वैद्यकीय अधिकारी डॉ जि. एम.पाटील,डॉ.संदीप जोशी,डॉ.प्रशांत शिंदे,डॉ.सुमित पाटील,डॉ परेश पाटील,बांधकाम अभियंता भागवत माळी यासह कर्मचारी उपस्थित होते.

## प्रेरणादायी नेतृत्व : भरतदादा अमळकर

**पान १ वरून :** डॉ.भरतदादा अमळकर यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभे केले. ग्रामीण आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे, यासाठी त्यांनी अनेक शैक्षणिक उपक्रमांना चालना दिली. संस्थांमध्ये आर्थिक स्वावलंबन, शास्त्रीय व्यवस्थापन आणि सामूहिक निर्णयपद्धती यांचा आग्रह त्यांनी सातत्याने धरला. त्यामुळे केशवस्मृती परिवाराची ओळख केवळ खानदेशापुरती मर्यादित न राहता राज्यभर पोहोचली.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान उपकार्यबल गटावर त्यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. शिक्षण क्षेत्रातील त्यांचा अनुभव आणि व्यवस्थापन कौशल्य याची ही महत्त्वपूर्ण दखल मानली जाते. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या विविध समित्यांवर सदस्य म्हणून त्यांनी काम केले आहे. नियामक परिषद तसेच कृती पुनरीक्षण समितीवर त्यांनी प्रभावी भूमिका निभावत तंत्रशिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता सुधारणा, अभ्यासक्रम विकास आणि व्यवस्थापन प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी योगदान दिले.त्यांच्या नेतृत्वशैलीत पारदर्शकता, निर्णयक्षमता आणि संघभावना हे गुण ठळकपणे दिसून येतात. संस्थेच्या विकासासाठी आवश्यक ते कठोर निर्णय घेण्याची क्षमता आणि कार्यकर्त्यांना जोडून ठेवण्याचे कौशल्य यामुळे ते अनेक संस्थांचे केंद्रबिंदू बनले आहेत.

डॉ.भरतदादा अमळकर यांनी समाजकार्याला केवळ उपक्रम म्हणून नव्हे, तर जीवनमूल्य म्हणून स्वीकारले. वृद्धाश्रम, रक्तपेढी, आरोग्य सेवा, विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन, सामाजिक संस्थांना सहकार्य, आपत्ती व्यवस्थापन आणि विविध सेवा प्रकल्पांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून संस्थात्मक कार्य कसे उभे करावे, याचे उदाहरण त्यांनी निर्माण केले आहे.खेळ आणि संस्कार यांचा परस्पर संबंध अधोरेखित करत युवकांना सकारात्मक जीवनमूल्यांची दिशा देण्याचे कार्यही त्यांनी सातत्याने केले. 'खेळातून केवळ विजय नाही, तर व्यक्तिमत्त्व घडते,' हा त्यांचा संदेश युवकांमध्ये प्रेरणा निर्माण करणारा ठरला आहे.

डॉ.भरतदादा अमळकर यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे आध्यात्मिक आणि धार्मिक क्षेत्रातील त्यांचा सहभाग. अमळनेर येथील प.पू. प्रसाद महाराज गुरू ज्ञानेश्वर महाराज संस्थान येथे विश्वस्त म्हणून त्यांनी अत्यंत जबाबदारीने कार्य केले आहे. संस्थानाच्या धार्मिक, सामाजिक आणि सेवाभिमुख उपक्रमांना आधुनिक व्यवस्थापनाची जोड देत त्यांनी भक्त आणि समाज यांच्यातील संवाद अधिक दृढ केला. संस्थानाच्या माध्यमातून अध्यात्मिक परंपरा जपत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा त्यांचा प्रयत्न विशेष उल्लेखनीय मानला जातो. धार्मिक क्षेत्रातील कार्य करताना त्यांनी श्रद्धा आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर समन्वय साधला आहे. त्यामुळे संस्थानाच्या कार्यात अधिक शिस्त, नियोजन आणि लोकसहभाग वाढल्याचे मानले जाते.

शिक्षण आणि सामाजिक उद्योजकता क्षेत्रातील दीर्घकालीन योगदानाची दखल घेत अजिंक्य डी. वाय. पाटील इनोव्हेशन विद्यापीठ यांनी त्यांना 'डॉक्टर ऑफ लेटर्स (डी.लिट.)'ही मानद पदवी प्रदान केली. हा सन्मान त्यांच्या बहुआयामी कार्याची अधिकृत पावती मानला जातो.

आजच्या स्पर्धात्मक आणि व्यक्तिकेंद्री वातावरणात समाजाला जोडणारे, शिक्षणाला मूल्याधिष्ठित दिशा देणारे, सामाजिक बांधिलकी जपणारे आणि अध्यात्मिक सेवेला आधुनिक व्यवस्थापनाची जोड देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून भरतदादा अमळकर यांचे नाव आदराने घेतले जाते.

शिक्षण, समाजकार्य, तंत्रशिक्षण, युवक विकास, संघटन आणि धार्मिक-सांस्कृतिक सेवा या सर्व क्षेत्रांत त्यांनी उभारलेले कार्य हे खानदेशासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांचा जीवनप्रवास नव्या पिढीला सामाजिक उत्तरदायित्व, सकारात्मक नेतृत्व आणि सेवाभावी जीवनमूल्यांची प्रेरणा देणारा ठरत आहे. अशा आदरणीय दादांना 'ग्लोबल महातेज' परिवारातर्फे अनेकोत्तम 'मंगलमय' शुभेच्छा..!


















हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# महालोकयोद्धा...नामदार श्री. गिरीशभाऊ महाजन

**जळगांव जिल्ह्यातील जामनेर गावातील माननीय दत्तात्रय भिका महाजन व माननीय गिताताई महाजन यांचा घरी १७ मे १९६० रोजी महालोकयोध्दा नामदार श्री. गिरीशभाऊ महाजन यांच्या जन्म झाला. माननीय श्री. दत्तात्रय महाजन हे कृषी शिक्षक होते.गुजर पाटील सर्व साधारण कुटुंब पूर्ण जामनेर गावात जनसेवा,मदत, सहकार्य महाजन परिवार करत होते. गरीब व श्रीमंत सर्वांना मदत करत असत, दु:खात व सुखात महाजन कुटुंब अग्रेसर राहत होते...**



बालपणात गिरीशभाऊच्या मनात स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज व थोर स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या आदर्श डोळे समोर ठेवून गिरीशभाऊंनी सामाजिक कार्य साठी स्वत: वाहून घेतले आहे. तसेच RSS, ABVP, जनसंघाचे विचार व भारतीय जनता पक्षाची विचारसरणी मनात रुजली गेली, माननीय डॉ.हेगडेवार, माननीय गोळवलकर गुरुजी, माननीय डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी,माननीय पंडित दीनदयाल उपाध्याय, माननीय अटलजी,माननीय अडवाणीजी,लोकनेते नानासाहेब उत्तमराव पाटील यांच्या विचाराने प्रेरित होऊन देश,राष्ट्र,देव,धर्म समाजसेवा या विचाराची ज्योतमनात पेटली गेली, गिरिशभाऊ यांनी शुन्यमधून विश्व तयार केलं. त्याचा करता गिरीशभाऊंना महालोकयोद्धा जनता बोलते...

विद्यार्थी काळात गिरीशभाऊना क्रिकेट,कबड्डी, खोखो, विटीदांडू, कुस्ती सर्व खेळात तरबेज व ऑलराऊंडर होते.तर शाळेत हुशार व चाणाक्ष होते, लहानपणापासून मित्र परिवार जोडणे, सर्वांना एकत्र घेऊन,सर्वांना सोबत घेऊन कोणतेही काम करायचं असेल तर एकजूट महत्त्वाची असते, गिरीश भाऊंनी सर्वांना सोबत घेऊन सर्व सण, उत्सव, जयंती उत्सव निमित्ताने एकत्र येऊन साजरा करणे. सेवा, समर्पण, त्याग हीच भूमिका मनात ठेवून विद्यार्थी काळात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ABVP चे काम सुरू केलं १९७८/७९ काळात ABVP चे जामनेर चे तालुका अध्यक्ष पदी निवड झाली, १२ वीचे पूर्ण करून बी. कॉम चे शिक्षण करतांना गिरीशभाऊनी १९८२/८३ मध्ये कॉलेज मध्ये बीकॉम करताना जनरल सेक्रेटरी पदी निवडून आले...

गिरीशभाऊची १९८८/९० या काळात भारतीय जनता युवा मोर्चा चे तालुकाध्यक्ष निवड झाली पुढे मग १९९०/९३ मध्ये गिरीशभाऊ ची जामनेर तालुका भारतीय जनता पार्टी चे तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्या काळात गिरीशभाऊचा विवाह पळसखेडा येथील साधनाताई यांचा सोबत विवाह संपन्न झाला. सौ.साधनाताई गिरीशभाऊ महाजन यांनी जामनेर जिल्हा परिषद गटात जिल्हा परिषद सदस्या म्हणून निवडून आल्या आहेत. गिरीशभाऊ १९९२ काळात जामनेर ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवड,लगेच सरपंच पदावर निवड झाली,गिरीशभाऊ व साधनाताई यांना दोन कन्यारत्न जन्माला आल्या म्हणजे साक्षात लक्ष्मी घरात आल्या प्रियाताई व श्रेयाताई त्यानंतर गिरीशभाऊ यांनी राजकारणात मागे वळून कधीच पाहिले नाही.गिरीशभाऊना साधना ताई चा भक्कम साथ व पाठिंबा लाभला, गिरीश भाऊ व साधनाताई यांना राजकारणात कायम यश संपादन करत गेले...

गिरीशभाऊंनी १९९२/९२ काळात राममंदिर साठी आंदोलन केले, श्री राममंदिर साठी आंदोलन करताना गिरीशभाऊंना खूप मानसिक त्रास सहन करावा लागला.पण भाऊमागे हटले नाही, कारण भाऊना साथ साधनाताईची, पूर्ण मित्र परिवार व संपूर्ण महाजन परिवार गिरीशभाऊ सोबत होता. रथयात्रा मध्ये महत्त्वाचा सहभाग व राममंदिर साठी मोठा सहभाग घेणारे आपले गिरीश भाऊ महाजन होते...

गिरीशभाऊ यांनी १९९५ मध्ये जामनेर विधानसभा निवडणुकीत भाजप पक्षाचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवली.तसेच जामनेर तालुक्यातील युवा आमदार महाराष्ट्र भर परिचित झाले. युवा आमदार म्हणून निवडून आले. गिरिशभाऊ यांनी १९९५ निवडणूक लढवली जिंकुन खूप खूप मोठा इतिहास रचला आहे. अश्या माणसाचा पराभव केला आहे, तो माणूस पुन्हा राजकारणात व जामनेर गावात दिसला पण नाही. त्याचा करता गिरीशभाऊ महाजन यांना महालोकयोद्धा म्हणून ओळखले गेले. गिरीश भाऊंनी एक स्वत: चे व्यक्तिमत्व निर्माण केलं. गिरीशभाऊ यांनी १९९५,१९९९,२००४,२००९,२०१४,२०१९,२०२४ सतत विधानसभा निवडणुकीत विजयी होत गेले...७ वेळ आमदार म्हणून निवडून आले,जामनेर नगरी चे आमदार म्हणून प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रभर काम केलं...

गिरीशभाऊ यांनी भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ, प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून आयुष्यभर काम केलं, RSS व ABVP जनसंघाचे विचार घेऊन सामाजिक कार्य व समाजसेवा जोपासली, गिरीशभाऊ यांनी हजारो परिवार साठी आरोग्य, वैद्यकीय मदत व विविध प्रकारचे कार्य केले, किडनी, हृदय,रक्तदान साठी २४ तास, ३६५ दिवस सेवा केली, गल्ली पासून ते मुंबईपर्यंत सर्व प्रकारच्या आजारावर सेवासाठी टीम तयार करून स्वत: लक्ष केंद्रित करुन जळगांव जिल्ह्यात एकमेव हक्काची व्यक्ती म्हणून रुग्ण साठी काम करणारा आमदार महाराष्ट्रभर महालोकयोद्धा म्हणून गिरीश भाऊंची ओळख निर्माण झाली...

गिरीशभाऊ यांनी राजकारणात प्रवेश केला, स्वत: साठी कधीच विचार केला नाही, देशसेवा,समाजसेवा व जनता हेच आपले घर व आपला परिवार आहे, त्याचाकरता आपल्याला काम व सेवा करायची आहे, त्याचा करता गिरीशभाऊ यांना भारतीय जनता पक्षाने भाजपा राज्य उपाध्यक्ष, जळगांव जिल्हा चे जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य युवा मोर्चा चे उपाध्यक्ष व चिटणीस, प्रादेशिक उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश, गिरीशभाऊंनी भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध विविध प्रकारचे पदे घेऊन पक्षाची काम केली, गिरीशभाऊंनी भाजपा विधिमंडळ पक्षाचे प्रतोद निवडणूक म्हणून निवड झाली, विधिमंडळ मध्ये भाजप चे कामकाज पाहिले, गिरीशभाऊंनी भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध प्रकारचे आंदोलन, मोर्चे, आमरण उपोषण, शेतकरी आंदोलन, पाण्यासाठी आंदोलन व शासकीय योजना व शासकीय निधी साठी आंदोलन केले, त्याचा करता गिरीशभाऊ महाजन हे महालोकयोद्धा म्हणून व्यक्तिमत्व उदयास आले...

२०१४ मध्ये भारत देशात सत्ता परिवर्तन घडवून आणणारे माननीय देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, माननीय अमित शहा, राजनाथ सिंग, गोपीनाथ मुंडे,नितीन गडकरी यांनी देशात सत्ता व महाराष्ट्र राज्यात सत्ता परिवर्तन करून एक मोठा इतिहास घडवून आणला, त्याचा नंतर महाराष्ट्र राज्य मध्ये माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नामदार गिरीशभाऊ महाजन,भाऊसाहेब फुंडकर,विनोद तावडे, सुधीर मुनगंटीवार,चंद्रशेखर बावनकुळे व रविद्र चव्हाण यांनी खुप मेहनत कष्ट करून राज्यात सत्ता परिवर्तन केले...भाजपा सरकार स्थापन झाले...

२०१४ मध्ये जेव्हा केंद्रात माननीय नरेंद्र मोदी सरकार स्थापन झाले.त्याचा नंतर महाराष्ट्र राज्य मध्ये माननीय देवेंद्र फडवणीस सरकार स्थापन झाले. तेव्हा २०१४ राज्य सरकारच्या काळात नामदार गिरीशभाऊ महाजन यांना टॉप ५ मंत्रीमध्ये नामदार गिरीशभाऊ महाजन यांनी मंत्री पदाची शपथ घेऊन जामनेर व जळगांव जिल्ह्याचे नाव मोठे केले.गिरीशभाऊ महाजन वर उत्तर महाराष्ट्र ची पण जबाबदारी दिली गेली, २०१४/१९ काळात गिरीशभाऊंनी जलसंपदा मंत्री, लाभक्षेत्र विकास मंत्री, वैद्यकीय शिक्षणमंत्री, आपत्ती व्यवस्थापन मंत्री तसेच नाशिक पालकमंत्री, जळगांव पालकमंत्री, नंदुरबार पालकमंत्री धुरा सांभाळली होती, अजून कुंभमेळा मंत्री उल्लेखनीय कारभार सांभाळला आहे...

२०२२ ते २०२४ ग्रामीण विकास मंत्री, वैद्यकीय शिक्षण विभाग मंत्री, नाशिक पालकमंत्री होते. २०२३/२४ पर्यटन मंत्री, २०२४ नंतर जलसंपदा मंत्री व आपत्ती व्यवस्थापन मंत्री, नाशिक कुंभमेळा मंत्री म्हणून महाराष्ट्र सरकार चे उल्लेखनीय कार्य करत आहे.२०१४ ते २०२६ काळात गिरीशभाऊंनी संपूर्ण महाराष्ट्रभर सर्व रोगनिदान आरोग्य शिबिर, रक्तदान शिबिर आयोजित केले होते,त्याचा करता गिरीशभाऊ महाजन अखंडपने सेवा करत आहे.देशसेवा, समाजसेवा व लोकसेवा हा त्याचा आयुष्यातील प्रवास मांडला आहे...

माननीय नामदार श्री. गिरीशभाऊ महाजन यांना वाढदिवस निमित्त खूप खूप मनापासून शुभेच्छा...१७ मे १९६० , पुन्हा एकदा महालोकयोद्धा नामदार गिरीशभाऊ यांना वाढदिवस निमित्त शुभेच्छा...

**शरद (अण्णा) पवार**
**कवी, लेखक, समाजसेवक**
**संस्थापक अध्यक्ष**
**छावा जनक्रांती संघटना महाराष्ट्र राज्य**










# मा.ना.गिरीशजी महाजन

## अभिष्टचिंतन विशेष पुरवणी








































